# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. सआ/आर/द/011454/परि. दिनांक 22.07.2019

# जाहिर नोटीस

विषय – आर/ दक्षिण विभाग कांदिवली (पूर्व) येथील रस्त्यांवर पे अॅण्ड पार्क योजना राबविण्यासंबंधी.

संदर्भ –DMC(Z-VII)/113/W Dated 15.07.2019

खालील उल्लेखीत दहा स्थळांवर ६ महिन्यांकरीता प्रायोगिक तत्तवावर पे अॅण्ड पार्क योजना राबविण्याकरीता इच्छूक निविदाकारांकडून एकत्रित दहाही पे अॅण्ड पार्क स्थळांकरीता, सहाय्यक आयुक्त (आर/दक्षिण ) विभाग यांचे कार्यालयाकडून सिल बंद लिफाफ्यात देकार मागविण्यात येत आहेत. पे अॅण्ड पार्कचा पत्ता , त्यामध्ये उपलब्ध असलेल्या पार्किंगच्या जागेचा तपशील व अपेक्षित प्रति माह शुल्क खालील प्रमाणे आहे. तसेच त्याचा नकाशा मनपाच्या संकेतस्थळावर व आर/दक्षिण विभागाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

| अ.क्र॰ | स्थळांची नावे | पार्किंगसाठी उपलब्ध जागा | | | | प्रति माह अपेक्षित शुल्क (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | चार चाकी | तीन चाकी | दोन चाकी | ट्रक /टेम्पो | |
| 1 | १२०'०" फुट रस्ता, लोखंडवाला सर्कल ते क्रांतिनगर रिक्शा स्टॅण्ड (पश्चिम भाग) | 46 | 26 | - | 5 | 1,40,800/- |
| 2 | ४४ '०" फुट रस्ता, सफायर हाईट बिल्डिंग ते अनुदत्त शाळा (पूर्व व दक्षिण भाग) | 62 | 124 | 20 | - | 2,63,600/- |
| 3 | ४४ '०" फुट रस्ता, ग्रीन हीलको.ऑ.हौ.सो. ते सफायर हाईट बिल्डिंग (पश्चिम व दक्षिण भाग) | 38 | - | - | - | 75,600/- |
| 4 | ४४ '०" फुट रस्ता, अनिता विहार ते को.ऑ.हौ.सो.(पश्चिम भाग) | 54 | 47 | 19 | - | 1,70,300/- |
| 5 | ४४ '०" फुट रस्ता, ईसबेल को.ऑ.हौ.सो. ते सफायर हाईट बिल्डिंग रस्ता (दक्षिण भाग) | 40 | - | - | - | 79,600/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | ४४ '०" फुट रस्ता, नेबरहूड को.ऑ.हौ.सो. ते सफायर हाईट बिल्डिंग रस्ता (दक्षिण भाग) | - | 52 | - | - | 51,700/- |
| 7 | ६० '०" फुट रस्ता, हायलॅण्ड को.ऑ.हौ.सो. ते नेबरहूड को.ऑ.हौ.सो. (पूर्व भाग) | 83 | 114 | - | - | 2,78,400/- |
| 8 | ४४ '०" फुट रस्ता, ग्रीन मेडॉस को.ऑ.हौ.सो. ते वीर अब्दुल हमीद गार्डन रोड(पूर्व व उत्तर भाग) | 121 | - | - | - | 2,40,600/- |
| 9 | ६० '०" फुट रस्ता, मनकामेश्वर पीएससी ते पी/नॉर्थ हद्द रस्ता (पश्चिम भाग) | 36 | 137 | - | - | 2,07,800/- |
| 10 | ४४ '०" फुट रस्ता, क्रांतिनगर रिक्शा स्टॅण्ड ते मनकामेश्वर रोड (उत्तर भाग) | - | 199 | 41 | - | 2,32,800/- |
| | | | एकूण प्रति माह अपेक्षित शुल्क रु. | | | 17,41,200.00 |

इच्छूक निविदाकारांनी, वरील नमूद दहा पे अॅण्ड पार्क स्थळांकरीता अपेक्षित प्रति माहे शुल्क रु. १७,४१,२००.०० व तसेच सोबत जोडलेले 'अटी व शर्ती' आणि 'दंड आकारणी' हे सर्व विचारात घेऊन, वरील नमूद दहा पे अॅण्ड पार्क स्थळांकरीता एकत्रित देकार सहाय्यक आयुक्त (आर/द) यांचे कार्यालयातील सूचना फलकावर व मनपाच्या संकेत स्थळावर ही जाहीरात प्रसिध्द झाल्यापासुन म्हणजेच दि. २३.०७.२०१९ पासून ७ दिवसांचे आत म्हणेजच दि. २९.०७.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सहाय्यक अभियंता (परिरक्षण) आर/द विभाग, पे अॅण्ड पार्क योजना राबविण्यासाठी असे नमूद करुन सिल बंद लिफाफ्यात खालील पत्त्यावर सादर करावा.

सहाय्यक अभियंता (परिरक्षण) आर/दक्षिण, विभाग
कार्यालय, २ रा मजला,
स.व.प. तरण तलावाजवळ,
महात्मा गांधी काट रस्ता क्र.२,
कांदिवली (प), मुंबई -०६७.

सदरहू देकार दि. २९.०७.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता सहाय्यक अभियंता (प) आर/द यांचे कार्यालयात उघडण्यात येतील. कंत्राटदार / प्रतिनिधींची इच्छा असल्यास वरील वेळेत उपस्थित राहू शकतात.

सही/- 22.07.2019

**सहाय्यक आयुक्त, आर/दक्षिण**

अटी व शर्ती -

१) कंत्राटदारास सोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शविल्या प्रमाणेच दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहनांचे शुल्क आकारणे तसेच वाहन चालक /मालक यांस पावती देणे बंधनकारक राहिल.

२) उल्लेखीत स्थळांवर नकाशात नमूद गाडयांच्या संख्येपेक्षा जास्त गाडया लावण्यास सक्त मनाई असेल व तसे आढळल्यास नियमानुसार दंड आकारण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

३) निवड झालेल्या कंत्राटदारांनी दिलेल्या १ महिन्यासाठीच्या देकारा ऐवढी रक्कम सिक्युरीटी ठेव (Security Deposit) म्हणून मनपाकडे भरणे बंधनकारक राहील. सदर ठेव (Deposit) मनपाकडे भरल्यानंतरच कार्यादेश जारी करण्यात येईल. सदरहू रक्कम पे अॅण्ड पार्क कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतरच कंत्राटदारास परत करण्यात येईल .

४) कंत्राटदाराने ६ महिन्यांच्या कालावधीपूर्वी सदरहू पे अॅण्ड पार्क काही कारणास्तव बंद केल्यास १ महिन्याच्या अनुज्ञापन शुल्काच्या ठेवी (Deposit) साठी भरलेली रक्कम जप्त करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

५) अनुज्ञापन शुल्काची रक्कम ही प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत डी.डी ने भरणे कंत्राटदारास बंधनकारक आहे त्यानंतर भरल्यास प्रति दिवशी ५०० रुपये प्रमाणे दंड आकारण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

६) उपरोक्त पे अॅण्ड पार्क ६ महिन्यांच्या कालावधी करीता असुन या कार्यालयास आवश्यता भासल्यास कंत्राटदारास कोणतेही कारण न देता बंद करण्याचा अधिकार राहील.

७) पे अॅण्ड पार्क स्थळांवर पुरेसा कर्मचारी वर्ग ओळखपत्र व गणवेशात असणे बंधनकारक आहे.

८) देकाराच्या रक्कमेवर शासन निर्धारीत जी.एस.टी, सी.जी.एस.टी तसेच टी.डी.एस कंत्राटदाराकडून अनुज्ञापन शुल्काचा भरणा करते वेळी वसुल करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

९) पे अॅण्ड पार्क बाबत स्थळावर कंत्राटदाराचा नावाचा फलक तसेच मनपाने निर्धारित केलेले दर ठळक अक्षरात लावणे बंधनकारक राहील. निर्धारित दरापेक्षा जास्त रक्कम आकारलेली आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

१०) इच्छुक कंत्राटदारानी देकाराबरोबर व्हेंडर नं. व जीएसटी नं. नमूद करणे बंधनकारक राहील.

११) उपरोक्त स्थळांसाठी लागणारी स्टेशनरी जसे, पावती पुस्तक (क्रमांकासहीत) तसेच कर्मचा-यांचा गणवेष, नकाशात दर्शविल्याप्रमाणे पार्किंग स्लॉट तयार करण्यासाठी थरमोप्लास्ट पेंट मारणे इ. खर्च कंत्राटदाराने सर्वस्वी स्वतः करणे बंधनकारक राहील.त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

१२) पे अॅण्ड पार्क स्थळांवर उभ्या करण्यात आलेल्या गाडयांची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदाराची राहील. तसेच गाडयांची चोरी, आग लागल्यास, कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास, वाहतुक पोलिसांनी गाडी टोईंग केल्यास, समाज विघातक कृत्यासाठी वापरण्यात आलेली किंवा वापरण्यासाठी गाडी पार्क केल्यास त्याची जबाबदारी पूर्णतः कंत्राटदाराची राहील.

१३) सदरहू वाहन तळाची पाहणी तसेच पावती पुस्तक इत्यादींची तपासणी करण्याचा अधिकार सहा.आयुक्त आर/दक्षिण यांच्या कार्यालयातील संबंधीत अधिका-यांना राहील.

१४) वरील नियमांचे उल्लंघन केलेले आढळल्यास सोबत जोडलेल्या पत्रानुसार दंड आकारण्याचा वा कार्यादेश रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

१५) सदरहू पे अॅण्ड पार्क दुस-या कंत्राटदाराला परस्पर भाडयाने ( Sublet) देता येणार नाही.

१६) स्थानिक पोलिस, वाहतुक पोलिस तसेच संबंधित इतर सरकारी आस्थापनांच्या नियमांचे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१७) अग्निशनम यंत्रणेची व्यवस्था करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१८) इच्छूक कंत्राटदारांनी स्वखर्चाने ५००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर वरील अटी शर्ती मान्य असल्याचे मनपास लिहून देणे बंधनकारक राहील.

१९) इच्छुक कंत्राटदारांनी एकत्रितपणे दहाही पे अॅन्ड पार्क स्थळांसाठी देकार देणे अनिवार्य आहे. स्थळ निहाय देकार प्राप्त झाल्यास सदर देकार ग्राह्य धरण्यात येणार नाही.

<u>दंड आकारणी –</u>

१) नियमित पे अ‍ॅण्ड पार्कच्या नियत दरापेक्षा जास्त दर आकारलेला आढळल्यास दंड रु.१०००/-

२) नकाशात दर्शविलेल्या नमूद संख्येपेक्षा जास्त गाडया पार्क केलेल्या आढळल्यास दंड रु. ५०० /-

३) पे अ‍ॅण्ड पार्कच्या दरांचा बोर्ड न लावल्यास दंड रु ५००/-

४) पे अ‍ॅण्ड पार्क कर्मचारी गणवेषाशिवाय आढळल्यास दंड रु.५००/-

५) पार्किंग परिसर स्वच्छ न ठेवल्यास दंड रु.५०० /-

६) अग्निशमन यंत्रणा प्रत्येक पार्किंग स्थळावर उपलब्ध करुन न दिल्यास दंड रु.५०० /- प्रती दिन प्रमाणे जो पर्यन्त अग्निशमन यंत्रणा उपलबध करत नाही तो पर्यंत.

७) नकाशात दर्शविल्याप्रमाणे पार्किंग स्लॉट थरमोप्लास्ट पेंट न आखल्यास दंड रु. १०००/-

८) पे अ‍ॅण्ड पार्क बाबत अभिलेख परिरक्षित न केल्यास दंड रु. ५००/-

सही/- 22.07.2019

**सहाय्यक आयुक्त, आर/दक्षिण**